# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ३७४/२०२४ दिनांक ०८/१०/२०२४

## प्रेस नोट

### “Facebook Group वरील Share Trading मध्ये गुंतवणुक करण्यास सांगून तक्रारदार यांची फसवणूक केलेल्या रक्कमेपैकी २१,९३,२७९/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश ”

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील भाईंदर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार नामे श्री. सांघवी यांनी फेसवबुकवर शेअर ट्रेंडिंग करुन अधिक नफा मिळविण्याबाबत जाहिरात पाहिली. जाहिरातीमध्ये नमुद व्हॉटसअप ग्रुप मध्ये मॅसेज करुन तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक ॲड केला. त्यानंतर नफा मिळविण्याचे उद्देशाने पैशांची गुंतवणुक केली. तक्रारदार यांनी नफा मिळविलेली रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता त्यांना रक्कम काढता येत नसल्याचे लक्षात आल्याने आर्थिक फसवणुक झाल्याचे त्यांचे लक्षात आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने तक्रारीची नोंद घेण्यात आली आहे. तसेच सदर फसवणुकीबाबत भाईंदर पोलीस ठाणे २१३/२०२४ भादविसं कलम ४२०,४०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन तपास सुरु आहे.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक १३६७-बी/२०२४ अन्वये.)**

तक्रारदार यांचे तक्रारी अर्जातील प्राप्त व्यवहाराचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया खात्यांमध्ये वर्ग झाल्याची माहिती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम वर्ग झालेले खाते तात्काळ गोठविण्याकरीता संबंधीत बँकेंना पत्रव्यवहार करण्यात आले. तक्रारदार यांची रक्कम गोठविलेल्या खात्यातील रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालय यांचेकडुन तसेच संबंधीत बँकेना वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन वारंवार पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी २१,९३,२७९/- रु मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवून फसवणूक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेंडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेंडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **कोणतेही अनाधिकृत Investment ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.**

- आपली वैयक्तिक तसेच बँकेसंबंधीत गोपनीय माहिती कोणासही उघड करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/स्नेहल पुणे, पोअं/ ओंकार डोंगरे, पोअं/कुणाल सावळे, पोअं/शुभम कांबळे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

----000----